Prosiding 27.2.2023

उद्योग संचालनालय
जिल्हा उद्योग केंद्र, हिंगोली
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, एस-१२, हिंगोली-431513.
Email : didic.hingoli@maharashtra.gov.in Tel.No.02456-222218

दिनांक : ०३ /०४/२०२३

**सविनय सादर**

विषय : जिल्हा उद्योग केंद्र हिंगोली च्या दिनांक २७.०२.२०२३ बैठकी बाबत.

महोदय,

जिल्हा उद्योग मित्र समितीची सभा/ जिल्हा सल्लागार समिती सभा/ स्थानिक लोकांना रोजगारसमिती सभा/आजारी उद्योग पुन्नरुज्जीवन समिती सभा/मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम जिल्हा कार्यबल समिती सभा(DLTFC)/ जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभा दिनांक २७.०२.२०२३ रोजी दुपारी १.०० वाजता. आपल्या अध्यक्षेतेखाली संपन्न झाली.

उपरोक्त सभेचे इतिवृत्त आपल्या मान्यतेस्तव व स्वाक्षरीस्तव सविनय सादर करण्यात येत आहे.

महाव्यवस्थापक
जिल्हा उद्योग केंद्र, हिंगोली

मा. जिल्हाधिकारी,हिंगोली.

आवक क्र. 120
आवक दि. 3-4-23
जावक दि. ........

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन

# जिल्हा उद्योग केंद्र,हिंगोली

जिल्हा उद्योग मित्र समितीची सभा दिनांक २७.०२.२०२३ रोजी दुपारी ठिक १.०० वा. मा. श्री. जितेंद्र पापळकर जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा उद्योग मित्र समिती सभा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त.

सर्व प्रथम महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव जिल्हा उद्योग मित्र समिती यांनी उपस्थितांचे स्वागत केले. व मा. अध्यक्ष्यांच्या परवानगीने सभेस सुरवात केली.

दिनांक ९.१२.२०२१ रोजीच्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेच्या इतिवृत्तास सर्वानुमते मान्याता दिली

| मूद्या क्र. | मुद्या उपस्थित करणा-या संस्थेचे नांव | मुद्याचे स्वरुप | प्राप्त अनुपालन अहवाल / सद्यस्थिती | संबधीत कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | हिंगोली जिल्हा औद्योगीक संघटना, हिंगोली | जिल्हयातील औद्योगीक क्षेत्र हिंगोली,कळमनुरी व वसमत मधील भुखंड संपले असून औद्योगीक क्षेत्र वाढविणे बाबत. | १.सदर मुद्याबाबत हिंगोली जिल्हयात औद्योगिक विकास महामंडळाचे हिंगोली, कळमनुरी व वसमत असे एकूण ३ औद्योगीक क्षेत्र अस्तीत्वात आहेत. सदर औद्योगिक क्षेत्रातील उद्योगासाठी भुखंड वाटपास शिल्लक नसल्यामुळे उद्योजकाकडून व स्थानिक लोकप्रतिनीधी कडून नविन औद्योगीक क्षेत्र स्थापन करणे संदर्भात निवेदन प्राप्त झाल्याने महामडळामार्फत हिंगोली जिल्हयात नव्याने खालील प्रमाणे औद्योगीक क्षेत्र प्रस्तावित केले आहे.<br>१. अतिरिक्त औद्योगिक क्षेत्र २२४.५५ आर (मौजे कामठा, येलकी, जरोडा व ड्रोंगरगाव पुल ता. कळमनुरी ) सदरील औद्योगिक भुसंपादनाचा प्रस्ताव महामंडळाच्या मुख्यालयास सादर केलेला असून सदर औद्योगिक क्षेत्रास मऔवि अधिनियम प्रकरण ६ ची अधिसूचना लागु करण्याची कार्यवाही मुख्यालय स्तरावरुन सुरु आहे.<br>२.वसमत येथे महामंडळाचे अतिरिक्त औद्योगिक क्षेत्र स्थापन करणेसाठी मौजे हयातनगर फाटा परीसरात सलग सरकारी जमीन उपलब्ध होऊ शकेल का याबाबत गट नं.(७/१२ उतारा ) व गाव नकाशा उपलब्ध करुन देणे बाबत तहसीलदार वमतम यांना विनंती करण्यात आली होती. परंतु माहिती अद्याप अप्राप्त असल्याने माहिती उपलब्ध झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल असे सांगीतले. या संदर्भात मा. अध्यक्ष यांनी वसमत येथे होऊ घातलेल्या एमआयडीसी मध्ये लॉजिस्टीक पार्क उभारण्याबाब मा. अध्यक्ष यांच्या स्वाक्षरीने पत्र पाठविण्या बाबत एमआयडीसी यांना सूचित केले. | RO MIDC Nanded |
| २ | हिंगोली जिल्हा औद्योगीक संघटना, हिंगोली | जिल्हयातील सेनगाव व औंढा तालुक्यामध्ये औद्योगीक क्षेत्र स्थापन करणे बाबत | मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष यांचे निर्देशानुसार सेनगाव व औढा तालुक्यात औद्योगीक क्षेत्र स्थापन करण्यासाठी नियोजन दृष्टया योग्य खाजगी व सरकारी जमीन उपलब्ध होऊ शकते का याबाबत गट नं. व गाव नकाशासह माहिती उपलब्ध करुन देणे संदर्भात सबंधीत तहसीलदार, औंढा व सेनगाव यांना मऔविमं नांदेड मार्फत कळविण्यात आले असून माहिती अद्याप अप्राप्त आहे. याबाबत मा. अध्यक्षांनी सदर प्रकरण त्वरीत निपटारा करणेसाठी तहसीलदार औंढा व सेनगाव यांना फोनवरुन सूचित करुन एमआयडी ने याबाबत तात्काळ कार्यवाही करावी असे सूचविले. | RO MIDC Nanded |
| ३ | हिंगोली जिल्हा | हिंगोली औद्योगीक | या मुद्याबाबत उप अभियंता मऔविम उप विभाग, परभणी यांचे पत्र क्र.--दिना २२.०२.२०२३ अन्वये हिंगोली औद्योगिक | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | औद्योगीक संघटना, हिंगोली | क्षेत्रातील पाण्याची टंचाई दुर करणे बाबत. | क्षेत्रातील [illegible]मस्वरुपी पाणी पुरवठा योजनेचा प्रशासकिय मान्यते[illegible] प्रस्ताव मऔविम मुख्यालयात मंजूर झाला असून अतिरीक्त हिंगोली औद्योगीक क्षेत्राची जागा ताब्यात आल्या नंतर निविदा काढण्याचे आदेश आहेत. हिंगोली ओद्योगीक क्षेत्रासाठी पाणी आरक्षणाचा प्रस्ताव मंजूरीसाठी मऔविम वरिष्ठ कार्यालयास सादर केलेला आहे. तसेच अतिरिक्त हिंगोली औद्योगिक क्षेत्राचा भूसंपादनाचा प्रस्ताव प्रादेशिक अधिकारी मऔविम यांचे कार्यालयातर्फे सुरु आहे. सदर प्रस्तावा बाबत कार्यवाही होणे करीता हिंगोली औद्योगिक क्षेत्राची जागा अधिग्रहण करण्याबाबत पाठपुरावा करावा असे मा. अध्यक्ष यांनी सूचविले. | Dy.E.MIDC Parbhani |
| ४ | औद्योगिक संघटना हिंगोली | MIDC हिंगोली क्षेत्रातील भुखंड परत घेणेबाबत | भुखंडधारकाने भुखंड विहीत कालावधीत विकसीत केला नसेल व विहीत कालावधी संपला असेल किंवा भुखंडधारकाने जर मुदतवाढ घेतली नसेल तर अशा भुखंडाचा महामंडळाचे परिपत्रक /धोरणा नुसार भुखंड परत घण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच कोविड महामारीमुळे भुखंड विकसीत करणे करीता दिड वर्षाचा कालावधी वाढविल्यामुळे ३० जून पर्यंत शेवटची संधी दिली आहे. असे प्रादेशिक अधिकारी MIDC नांदेड यानी सांगीतले. | RO MIDC Nanded |
| ५ | हिंगोली जिल्हा औद्योगीक संघटना | एमआयडीसी समोरील औंढा रोडवरील अतिक्रमण काढणे बाबत. | कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली यांनी सभेच्या दिनांका पासून पुढील आठवडयापर्यत सर्व अतिक्रमन काढावे व दिनांक १०.०३.२०२३ अखेर अतिक्रमन काढून तात्काळ माहिती सादर करावी असे मा.अध्यक्ष यांनी कार्यकारी अभियंता साबांवि यांना सूचित केले. | कार्यकारी अभियंता सा.बा.वि. हिंगोली |
| ६ | हिंगोली जिल्हा औद्योगीक संघटना | एमआयडीसी हिंगोली क्षेत्रामध्ये विजपुरवठा सुरळीत करणे . | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांनी एमआयडीसी लिंबाळा मक्ता येथे नवीन अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर मंजूर झाला असून माहे जून-२०२३ अखेर कार्यान्वीत होईल असे सांगीतले. त्वरीत कार्यवाही होणे करीता पाठपुरावा करावा असे मा.अध्यक्ष यांनी सूचविले. तसेच स्ट्रीट लाईटचे ८०% काम पुर्ण झाले असून माहे मार्च-२०२३ अखेर काम पुर्ण होईल असे अधिक्षक अभियंता महावितरण हिंगोली यांनी सांगीतले. | अधिक्षक अभियंता महावितरण हिंगोली |

शेवटी महाव्यवस्थापक यांनी अध्यक्षांच्या परवाणगीने उपस्थितांचे अभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

महाव्यवस्थापक
जिल्हा उद्योग केंद्र तथा सदस्य सचिव
जिल्हा उद्योग मित्र समिती,हिंगोली

मा.जिल्हाधिकारी
तथा अध्यक्ष
आजारी उद्योग मित्र समिती सभा, हिंगोली



Scanned with OKEN Scanner

Prosiding 27.2.2023

## जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभा दिनांक २७.०२.२०२३ चे इतिवृत्त

दिनांक १५.१२.२०२२ रोजी संपन्न झालेल्या **जिल्हा निर्यात प्रचालन समिती** सभेच्या इतिवृत्तास मान्याता देण्यात आली.

हिंगोली जिल्हयातून सन.२०२२-२३ या आर्थिक वर्षात साखर,रिफाईन्ड साखर,ड्राय टरमरीक, टर्मरीक पावडर, कॉटनबेल,काबोली चना, इत्यादि वस्तुचे प्रामुख्याने बांगलादेश, संयुक्त अरब अमिरात, इराक, इंडोनिशीया,मोरको, मलेशिया, चायणा, श्रीलंका इत्यादी देशात माहे डिसेंबर अखेर ३१९ कोटीची निर्यात झालेली असून निर्यातीचे प्रमाण मागील वर्षाच्या तुलनेत दुप्पटीने वाढलेले आहे. असे महाव्यवस्थापक यांनी सभाग्रहास सांगीतले

ODOP अंतर्गत हिंगोली जिल्हयासाठी हाळद व सोयाबीन उत्पादने यांची निवड करुन जिल्हयाची निर्यात वाढविण्यासाठी DGFT नागपुर व तसेच उद्योग संचालनालया मार्फत वेळोवेळी कार्यशाळेचे आयोजन केलेले आहे. तसेच यापुढे ODOP अंतर्गत फक्त एकाच उत्पादनावर न थांबता My District My Products असा बदल होणार आहे. त्यामध्ये अनेक उत्पादने सामाविष्ट करता येईल. यामुळे जिल्हयाची निर्यात क्षमता वाढविण्यास मदत होईल.

तसेच जिल्हयासाठी बसमत हाळद या नावाने GI Registration साठी नाबार्ड मार्फत प्रस्ताव तयार करुन पाठविण्यात आला असून याबाबत अंतिम सुनावणी बाकी असून माहे जून-२०२३ अखेर GI Registration ची कार्यवाही पुर्ण होईल अशी माहिती महाव्यवस्थापक जिउके हिंगोली यांनी दिली.यावर मा. अध्यक्ष यांनी याबाबत पाठपुरावा करुन लवकरात लवकर GI Registration नामांकना बाबत सर्वतोपरी सहकार्य करण्याच्या सूचना दिल्या.

शेवटी महाव्यवस्थापक यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांच्या वतीने सभा संपल्याचे जाहिर केले.

**महाव्यवस्थापक**
**तथा सदस्य सचिव**
**जिल्हा निर्यात प्रचालन समिती**
**जिल्ह उद्योग केंद्र हिंगोली**

**मा.जिल्हाधिकारी**
**तथा अध्यक्ष**
**जिल्हा निर्यात प्रचालन समिती हिंगोली**

Scanned with OKEN Scanner